# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

ता.फुलंब्री, जि. औरंगाबाद

# समाजशास्त्र विभाग

# वार्षिक अहवाल

## शै. वर्ष :– २०१९–२०

प्राचार्य

डॉ. एस. आर. टकले

समिती प्रमुख

डॉ. मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## समाजशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल २०१९—२०२०

समाजशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० मध्ये पुढील कार्यक्रम घेण्यात आले आहेत.

**कै. धुपाजी खोतकर पारितोषिक वितरण :**

महाविद्यालयात दि. १० ऑगस्ट २०१९ रोजी आयोजित करण्यात आलेल्या गुणवंत सत्कार कार्यक्रमात समाजशास्त्र बी. ए. तृतीय वर्षातील मुख्य विषय घेतलेल्या विद्यार्थ्यातून शैक्षणिक वर्ष २०१८—२०१९ साठी प्रथम आलेल्या कु. ज्योती रमेश उदे या विद्यार्थीनीस कै. धुपाजी खोतकर पुरस्कार मा. श्री. ना. हरिभाऊ बागडे नाना विधान सभा अध्यक्ष्य, महाराष्ट्र राज्य, संस्थचे पदाधीकारी श्री.श्याम सुंदर नाईक व देवजीभाई पटेल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

**अतिथी व्याख्यान :**

दि. २२ ऑगस्ट २०१९ रोजी डॉ. देवराज दराडे समाजशास्त्र विभाग प्रमुख, वंसतराव नाईक कॉलेज औरंगाबाद यांनी ''समाजशास्त्राची उपयोगिता'' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**भित्तीपत्रक प्रकाशन :**

दि. २३ ऑगस्ट २०१९ रोजी ''अखंड भारत ३७० कलम रद्द'' या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन डॉ. सचिन टेकाळे व महाविद्यालयाचे प्राचार्य एस. आर. टकले यांच्या हस्ते करण्यात आले.

महापरिनिर्वाण दिन व्याख्यान

प्रस्तुत महाविद्यालय आणि समाजशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमीत्त दि. ६ डिसेंबर २०१९ रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्यानासाठी डॉ. सुनिल नरवडे प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद हे वक्ते म्हणून लाभले होते. त्यांनी ''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य समाजवाद'' हा विषय मांडला. राज्य समाजवाद ही संकल्पना परस्परांशी निगडीत असून तिला आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून समजून घ्यायला हवे असे मत नरवडे यांनी मांडले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले डॉ. संजय साळुंके समाजशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद यांनी देखील

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार जिवनात अंगीकारावे असे आवाहन केले. सदरील व्याख्यान कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य. एस. आर. टकले यांनी भूषविले.

समाजशास्त्र शतकमहोत्सवी वर्ष कार्यक्रम :

१९१९ मध्ये भारतीय समाजशास्त्र विषयाच्या अध्ययन व अध्यापनास प्रारंभ झाला होता. २०१९ हे समाजशास्त्र विषयाचे शतकमहोत्सवी वर्ष असल्यामुळे विभागाच्या वतीने दि. १८ डिंसेबर २०१९ रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन केले होते. सदरील व्याख्यानासाठी प्रा. संदीप चौधरी सहयोगी प्राध्यापक, सरस्वती भुवन कला महाविद्यालय औरंगाबाद हे लाभले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ. गोविंद घुर्ये यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. चौधरी यांनी ''समाजशास्त्रातील व्यावसायिक संधी''या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सोबतच ''समाजशास्त्र विषयाची शतक महोत्सवी वाटचाल'' या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्रा. संदीप चौधरी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते करण्यात आले. चौधरी यांनी समाजशास्त्र विषयाला जागतीक पातळीवर खूप महत्त्व आहे तसेच मागणी आहे तरी विद्यार्थ्यांनी या विषयाचा अधिक चांगला अभ्यास करावा असे आवाहन केले.

सेमिनार :

दिनांक २४ सप्टेंबर २०१९ रोजी बी.ए. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे ''कलम ३७०'' या विषयावर सेमीनार घेण्यात आले ज्यात ५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दिनांक २२ फेब्रुवारी २०२० रोजी बी.ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे सेमीनार ''समकालीन भारतीय समस्या'' या विषयावर घेण्यात आले. ज्यात ४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

गटचर्चा :

दिनांक २६ सप्टेंबर २०१९ रोजी बी.ए. प्रथम व द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची '' स्त्रीयांच्या सामाजिक समस्या'' या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. यामध्ये १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

दिनांक १५ फेब्रुवारी २०२० रोजी बी.ए. प्रथम व द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांची ''भारतीय नागरिकत्व कायदा'' या विषयावर गटचर्चा घेण्यात आली. यामध्ये १२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

अभ्यास सहल

समाजशास्त्र विभागाची शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० ची अभ्यास सहल दिनांक ६ फेब्रुवारी २०२० रोजी ''हर्सूल मध्यवर्ती कारागृह'' येथे नेण्यात आली होती. सदरील सहलीत ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. हर्सूल मध्यवर्ती कारागृहात असलेल्या कैद्यांना पुनर्वसनासाठी काय नैतीक व व्यावसाधिक प्रशिक्षण दिले जाते या विषयीची सविस्तर माहिती तुरुंग अधिक्षक श्री जाधव सर यांनी दिली. कारागृहात चालणाऱ्या विविध

कारखान्यांची पाहणी करता आली. कारग्रहात शिवणकाम, सुतार काम, कापड विणने,लोखंडी काम इ संबंधीचे कारखाने आहेत. कारखान्यात तयार झालेला माल विकण्यासाठी कारागृहा बाहेर विक्री केंद्र उभारण्यात आले आहेत. जिथे कैदी विविध वस्तू विकतात. ज्यातून काही प्रमाणात कैद्यांना देखील पैसा मिळतो, जो ते आपल्या घरी पाठवतात. कैदी जेलमधून घरी परत आल्यावर समाजमान्य मार्गाचा अवलंब करुन आपले पूढील जीवन जगू शकतात.

## पी. पी. टी. तासिका:

समाजशास्त्र विभागाने शैक्षणिक वर्ष २०१९—२०२० मध्ये १० पी.पी.टी. तासिका घेतल्या आहेत. त्या पुढील प्रमाणे—

| दिनांक | विषय | विद्यार्थी संख्या | वर्ग |
|---|---|---|---|
| १८/०७/२०१९ | समाजिक समस्या | १० | BASY |
| ३१/०७/२०१९ | संशोधनाचे महत्त्व | ११ | BATY |
| १०/०८/२०१९ | समाजशास्त्रीय संकल्पना | १५ | BAFY |
| १६/०८/२०१९ | ऐतिहासिक भौतीकवाद कार्ल मार्क्स | ०८ | BATY |
| १५/११/२०१९ | समाजिक लेखा परिक्षण | १० | BASY |
| २९/११/२०१९ | भारतातील लोकसंख्या | ०९ | BASY |
| १७ /१२/२०१९ | समाजशास्त्राच्या उपशाखा | १२ | BATY |
| १०/०१/२०२० | स्व, स्व जाणिव—जी. एच. मीड | ०८ | BATY |
| ५/२/२०२० | एस. पी. एस. एस. | ०९ | BATY |
| १५/०२/२०२० | दहशत वाद | ०५ | BATY |

## सर्वेक्षण:

‘‘फुलंब्री येथील **शेतकऱ्यांचे लष्करी अळी व अतिवृष्ठी मुळे झालेले आर्थिक नुसकान**’’ शैक्षणिक २०१९—२०२० मध्ये विभागाच्या वतीने फुलंब्री येथील शेतीवर झालेल्या ‘‘ लष्कारी अळी आणि अतिवृष्टीच्या’’ प्रादूरभावाचा अभ्यास करण्यात आला. सदरील सर्वेक्षणासाठी लष्करी अळी आणि अतिवृष्टीला बळी ठरलेल्या ४० शेतकऱ्यांकडून माहिती संकलीत करुन तीचे विश्लेषण अहवालाद्वारे मांडण्यात आले. सदरील सर्वेक्षण कार्यात ४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## समाजशास्त्र विभाग

## वार्षिक अहवाल २०१९—२०२०

## कार्यक्रमाची छायाचित्रे

कै. धुपाजी खोतकर पारितोषिक वितरण                                   दि. १० ऑगस्ट २०१९




कु. ज्योती उदे हया विद्यार्थीनीस  कै. धुपाजी खोतकर पुरस्कार प्रदान करतांना मा. श्री. ना. हरिभाऊ बागडे (नाना), श्री. श्याम सुंदर नाईक व श्री. देवजीभाई पटेल.




डॉ. देवराज दराडे ''समाजशास्त्राची  उपयोगिता'' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.



भित्तीपत्रक प्रकाशन दि. २३ ऑगस्ट २०१९




"अखंड भारत" या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करतांना डॉ. सचिन टेकाळे व प्राचार्य डॉ. एस. आर. टकले डॉ. मंजुषा नळगीरकर व समाजशास्त्र विभागातील विद्यार्थी.

महापरिनिर्वाण दिपन व्याख्यान दि. ०६ डिसेंबर २०१९




"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा राज्य समाजवाद" या विषयावर मार्गदर्शन करतांना डॉ. सुनिल नरवडे (प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग, डॉ. बा. आं. मं.वि) व्यासपीठावर उपस्थित डॉ. संजय साळूंके व प्राचार्य डॉ. एस. आर. टकले.




डॉ. संजय साळूके (विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, डॉ. बा. आं. मं.वि) आपले विचार मांडतांना.

समाजशास्त्र शतकमोहत्सवी कार्यक्रम दि. १८ डिसेंबर २०१९




डॉ. गोविंद धुर्ये यांच्या जयंती निमीत्त प्रतिमेस अभिवादन करतांना मान्यवर व विभागातील विद्यार्थी.



''समाजशास्त्रातील व्यावसायिक संधी''या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना प्रा. संदीप चौधरी (सहु योगी प्राध्यापक सरस्वती भुवन कला महाविद्यालय औरंगाबाद) व्यासपीठावर डॉ. मंजुषा नळगीरकर व प्रा. अनिल जाधव.



**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय,फुलंब्री**
समाजशास्त्र विभाग भित्तीपत्रक
**भारतीय समाजशास्त्राची शतक महोत्सवी वाटचाल**
दि.१८ डिसेंबर २०१९

**※ भारतीय समाजशास्त्राचा विकास ※**
भारतात मुंबई विद्यापीठात सर्वप्रथम समाजशास्त्राचा स्वतंत्र विभाग १९१९ मध्ये सर पेट्रिक गिंडिग्ज यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला. व येथुनच भारतातील समाजशास्त्राच्या अध्यापनास सुरुवात झाली. प्रस्तुत विभागात १९२४ झाली सर डॉ.गोंविद सदाशिव धुर्ये हे समाजशास्त्र विभाग प्रमुख म्हणुन नियुक्त झाले, त्यांना भारतीय समाजशास्त्राचे जनक म्हणुन ही ओळखले जाते. मुंबई विद्यापीठानंतर भारतातील अन्य विद्यापीठात देखील समाजशास्त्र विषय अध्यापनास सुरुवात झाली.ती पुढीलप्रमाणे
विद्यापीठ – स्थापना वर्ष :–
कोलकाता विद्यापीठ – १९१७, लखनौ विद्यापीठ – १९२१, म्हैसूर विद्यापीठ – १९२३,
पटना विद्यापीठ – १९५१, इंदौर विद्यापीठ – १९५१, बडोदा विद्यापीठ – १९५४,
दिल्ली विद्यापीठ – १९५९
भारतामध्ये समाजशास्त्राचे अध्यापन करणारी विद्यापीठे व महाविद्यालयांची संख्या ३५६ विद्यापीठे ज्या मध्ये २० केंद्रीय विद्यापीठे, २११ राज्यस्तरीय विद्यापीठे, १०७ अभिमत विद्यापीठे आणि १४ महत्वाच्या राष्ट्रीय संस्थांची निर्मिती

**※ भारतीय समाजशास्त्रज्ञ – अभ्यास क्षेत्र ※**
१. डॉ.गोविंद धुर्ये (१८९३ ते १९६२) – जाती व वंश ,राजकीय समाजशास्त्र, संस्कृतीकरण.
२. धुर्जटी प्रसाद मुखर्जी (१८९४ ते १९६२ ) – मार्क्सवाद, प्रत्यक्षवाद, व्यक्तिकरण आणि स्पष्टीकरण , भारतीय परंपरा, इतिहास, सामाजिक परिवर्तन आणि भारतीय साहित्य.
३. रामकृष्ण मुखर्जी (१९१७–२०१५) – पद्धतीशास्त्र, कृषक समाज संरचना, भारतीय समाजशास्त्राचा विकास,आधुनिकतावाद.
४. इरावती दिनकर कर्वे (१९०५ ते १९७०) – सामाजिक, सांस्कृतिक आणि शरीर मानवंशशास्त्र,पुरातत्वशास्त्र ,समाजशास्त्र, – कुटुंब व आप्तसंबध आणि मानवशास्त्र.
५. निर्मल कुमार बोस (१९०१ ते १९७०) – मानवशास्त्र, भारतीय संस्कृती, इतिहास, स्थापत्य कला, पध्दतीशास्त्र, आदिवासी अध्ययन.
६. श्यामचरण दुबे (१९२२ ते १९९६) – सामाजिक संरचना आणि परिर्वन, आधुनिकीकरण, आर्थिक विकासाचे समाजशास्त्र
७. एम.एन. श्रीनीवास (१९१६ ते २०००) – परिवर्तन ,लिंगभाव पाश्चिमातीकरण ,आधुनिकीकरण, खेडे,कुर्ग जमात.
८. अक्षयकुमार रमणलाल देसाई (१९९५ ते २०००) – ग्रामीण समाजशास्त्र, नागरी समाजशास्त्र, राजकीय समाजशास्त्र आधुनिकीकरण , शेतकरी चळवळ आणि मानवाधिकार.

**※ भारतीय समाजशास्त्राच्या प्रमुख उपशाखा ※**
१ ग्रामीण समाजशास्त्र
२ नागरी समाजशास्त्र
३ औद्योगिक समाजशास्त्र
४ वैद्यकीय समाजशास्त्र
५ लोकसंख्याशास्त्र
६ धर्माचे समाजशास्त्र
७ सामाजिक मानसशास्त्र
८ सैध्दांतिक समाजशास्त्र
९ वर्गाचे आणि जातीचे समाजशास्त्र
१० लिंग भावाचे समाजशास्त्र
११ कायद्याचे समाजशास्त्र
१२ तुलनात्मक समाजशास्त्र
१३ मानवी परिसंस्थाशास्त्र
१४ लष्करी समाजशास्त्र
१५ विज्ञानाचे समाजशास्त्र
१६ ज्ञानाचे समाजशास्त्र
१७ माध्यमाचे समाजशास्त्र
१८ राजकीय समाजशास्त्र
१९ शिक्षणाचे समाजशास्त्र
२० गुन्हेगारीचे समाजशास्त्र
संपादक मंडळ – दिपाली बोलकर , सिमा जाधव, राजु खरात, शिवानी चंदे,

''समाजशास्त्र विषयाची शतक महोत्सवी वाटचाल'' या विषयावरील भित्तीपत्रकाचे प्रकाशन प्रा. संदीप चौधरी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांच्या हस्ते करण्यात आले

सेमिनार




२४ सप्टेंबर २०१९ रोजी ''कलम ३७०'' या विषयावर सेमिनार देतांना कु.शिवानी चंद्रे



२२फेब्रुवारी २०२० रोजी ''समकालीन भारतीय समस्या'' या विषयावर सेमीनार देतांना कु. सुजाता देवमाळी

गटचर्चा




२६ सप्टेंबर २०१९रोजी 'स्त्रीयांच्या सामाजिक समस्या'' या विषयावरील गट चर्चेत आपले मत मांडतांना कु. राजश्री काथार, अन्य विद्यार्थी व डॉ. मंजुषा नळगीरकर.




१५ फेब्रुवारी २०२० रोजी 'भारतीय नागरिकत्व कायदा' या विषयावरील गटचर्चेत आपले मत मांडताना विद्यार्थी व प्रा. अनिल जाधव.

अभ्यास सहल

दि. ६ फेब्रुवारी २०२०




हर्सूल मध्यवर्ती कारागृहास भेट प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक व समाजशास्त्राचे विद्यार्थी.




हर्सुल मध्यवर्ती कारागृहा बाहेर असलेल्या वस्तू निर्मीती व विक्री केंद्रास भेट प्रसंगी प्राध्यापक व विद्यार्थी.